**नि.क.२४ खालील आदेश**
**(दि.२६/०७/२०१९)**

प्रतिवादी कं.३ ने सदरचा अर्ज हा त्यांचे नाव सदरच्या दाव्यातुन कमी करण्यात यावे याकरीता सादर केला आहे. प्रतिवादी कं.३ ने त्यांच्या अर्जात अनुसया उर्फ सुलेखा मनोहरराव जगताप यांनी सदरचा दावा हा ती मयत मनोहरराव जगताप यांची पहिली पत्नी असल्याचे घोषीत करण्याकरीता व ती त्यांची पहिली पत्नी असल्यामुळे तिला भविष्य निर्वाह निधी मिळावा याकरीता सादर केला आहे. सदरच्या दाव्यातील वादाशी प्रतिवादी कं.३ चा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही संबंध नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्या अर्जात अशी विनंती केली आहे की, त्यांचे नाव सदरच्या दाव्यातुन कमी करण्यात यावे.

२) वादीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी कं.३ यांनी प्रतिवादी कं.२ व ५ यांच्याशी संगणमत करून खोटया कागदपत्राच्या आधारे प्रतिवादी कं.५ हिला मयत मनोहरराव जगताप यांचे निवृत्ती वेतन दिलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी कं.३ यांचा या दाव्यातील वादाशी कोणताही संबंध नाही ही बाब चुकिची आहे. पुढे त्यांनी त्यांच्या अर्जात अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३) वादीच्या वादपत्राचे अवलोकन केले असता त्यातील परिच्छेद कं.९ यात प्रतिवादी कं.४ यांनी वादीने त्यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहारासंबंधी त्यांनी प्रतिवादी कं.२ आणि ३ यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते असा उल्लेख आहे. प्रतिवादी कं.३ चा सदरच्या दाव्यातील वादाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या संबंध नाही ही बाब सध्याच्या स्थितीत पुराव्याअभावी निकाली काढता येणार नाही. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

अहमदपूर. (अ.रा.सुर्वे)
दिनांक : २६/०७/२०१९. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

Name of Stenographer : A.S.Kodgire
Dictated on : 26.07.2019
Checked on : 26.07.2019
Signed on : 26.07.2019
Uploaded on : 26.07.2019